Impact Factor 5.307 (SJIF)
**RESEARCH HUB**
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal
ISSN 2582-9173

# रशिया–युक्रेन युध्दाचा भारतीय अर्थव्यवस्थेवर पडलेला प्रभाव : एक अध्ययन

**डॉ. कैलाश फुलमाळी**
इतिहास विभाग प्रमुख
रेणुका कॉलेज, बेसा–नागपूर
मो.न.–७९७२९८५५५९
Email : fulmali.kailash@gmail.com

---

***सारांश :***

*२४ फेब्रुवारी २०२२ पासून रशिया–युक्रेन युध्दाला सुरूवात झाली. तेव्हापासून जगावर तिसऱ्या महायुध्दाचे संकट येते की काय अशी परिस्थीती निर्माण झाली आहे. तसेच जितके युध्द लांबत आहे. तितके जगावर आर्थिक संकट घोगांवत आहे. त्याचबरोबर या युध्दामुळे भारतीय अर्थव्यवस्था सुध्दा मोठयाप्रमाणात प्रभावित होत आहे. म्हणून सदर शोध निबंधामध्ये रशिया–युक्रेन युध्दाचा भारतीय अर्थव्यवस्थेवर पडलेला प्रभाव स्पष्ट करून निष्कर्ष प्रस्तुत करण्यात येत आहे.*

---

**प्रस्तावना :**

युक्रेन आणि रशियाच्या सीमा एकमेकांना मिळतात. युक्रेनला आपली ताकद वाढवण्यासाठी नाटोमध्ये सामील व्हायचे होते. युक्रेनने आपल्या भौगोलिक स्थितीचा फायदा घेत अमेरिकेला नाटोचे सदस्य बनवण्याची मागणी केली. त्यामुळे युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष व्होलोडिमिर झेलेन्स्की यांच्या या वागण्याने रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतिन यांनी युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष व्होलोडिमिर झेलेन्स्की यांना धडा शिकविण्यासाठी आणि इतर युनियन राष्ट्रांवर वचक राहावा म्हणून २४ फेब्रुवारी २०२२ ला युक्रेनवर आपले सैन्य पाठवून जोरदार आक्रमण केले. तेव्हापासून हे युध्द अविरत सुरूच आहे. यामध्ये युक्रेनचे अतोनात आर्थिक व जिवित नुकसान होत असले तरी युक्रेन रशियापुढे झुकण्यास सध्यातरी तयार दिसत नाही. तसेच अमेरिकेच्या प्रभावामुळे संयुक्त राष्ट्र संघटनेव्दारे (UNO) रशियावर अनेक आर्थिक निर्बंध लादण्यात आले. त्यामुळे रशियाव्दारे तेल आणि इतर वस्तुंची निर्यात कमी झाली त्यामुळे जागतिक अर्थव्यवस्था मोठयाप्रमाणात प्रभावित झाली. तसेच भारतीय अर्थव्यवस्थेवर सुध्दा मोठयाप्रमाणात प्रभाव पडलेला दिसून येतो.

**रशिया–युक्रेन युध्दाचा भारतीय अर्थव्यवस्थेवर पडलेला प्रभाव :**

१. **कच्या तेलाच्या किमतीत वाढ :** *या युध्दाच्या परिणामामुळे जागतिक बाजारपठेत कच्या तेलाच्या किमती वाढत आहे.*[१] त्यामुळे भारत सरकार दर हप्त्यामध्ये पेट्रोल, डिजेलच्या किमती वाढवत आहे. आज नागपूर शहरामध्ये १२२ रूपये पेट्रोल, डिजेल १०३ रूपये आणि घरगुती गॅस १०५४ रूपये दर आहे.

२. **महागाई :** *पेट्रोल, डिजेलजच्या किमती वाढल्यामुळे इतर वस्तुंचे भाव गगणाला भिडत आहे. सर्वसाधारण जनतेला भाजीपाला, दुध, अंडी, धान्य, औषधी खरेदी करणे कठिण होत आहे.*[२] त्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची पाळी आलेली आहे.

Research Hub International Journal

३. **पॅलेडियमच्या किंमतीत झपाट्याने वाढ :** *पॅलेडियमचं सर्वात जास्त उत्पादन रशियामध्ये केलं जातं. पॅलेडियमचा वापर हायब्रीड वाहन एक्झॉस्ट, मोबाईल फोन, इलेक्ट्रिक उपकरणे, दातांचे उपचार यांमध्ये केला जातो. परिणामी पॅलेडियमवर आधारित असलेल्या वस्तूंच्या किंमती वाढतील.* [३] शिवाय पॅलेडियमपासून दागिने देखील तयार केले जातात. या धातूपासून तयार झालेल्या साध्या एका अंगठीची किमत दिड लाखांच्या आसपास असते. मात्र युद्धामुळे या दागिन्यांच्या किंमती आणखी वाढतील.

४. **GDP मध्ये घट :** इकॉनामिक टाईम्सच्या वृत्तानुसार रूसो—युक्रेन युध्दामुळे पुरवठा खंडित होवून व्यापार घटू शकतो. यामुळे येत्या ६ ते ८ महिन्यात महागाई गगणाला भिडणार आहे. आर्थिक दबाव आणि अतिरिक्त चालु खात्यातील तूट (CAD) या सर्व घटकांमुळे भारताचा विकास खुंटणार आहे. भारतीय वित कोषावर त्याचा नकारात्मक परिणाम दिसून येईल. तसेच आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने भारताची एकून देशांतर्गत उत्पादनाची (GDP) वाढ या वर्षासाठी ७.१ टक्के राहील, असा अंदाज व्यक्त केला आहे.[४]

५. **चलन विनिमय दरावर परिणाम :** रशिया—युक्रेन युद्ध सुरू राहिल्यास चलन विनिमय दरावर परिणाम होणार असल्याचे म्हटले जात आहे. रुपयाचा दर घसरल्याने व्यापार खर्च वाढू शकतो. [५]

६. **धातू महाग झाल्यास ऑटो क्षेत्रावर परिणाम :** रशिया—युक्रेन युद्धाचा परिणाम मेटल सेक्टरवरही दिसून येणार असून भारताला रशियाकडून मोठ्या प्रमाणात धातूचा व्यापार होतो. याचा फायदा वाहन क्षेत्राला होतो. युद्धामुळे धातूच्या आयातीवर निर्बंध लागू झाल्यास वाहन क्षेत्राला फटका बसण्याची भीती आहे.[६]

७. **रशियासोबतच्या व्यापारातील आयात—निर्यात :** वर्ष २०२१ मध्ये, भारताने रशियाला एकूण ५५० दशलक्ष डॉलर्सची निर्यात केली आहे. रशियाकडून २६० दशलक्ष डॉलर्स आयात व्यापार झाला आहे.[७] युद्धामुळे आयात—निर्यात व्यापार प्रभावित होण्याची शक्यता नाकरता येत नाही.

८. **भारताच्या संरक्षण सज्जतेवर परिणाम :** भारत रशियाकडून मोठ्या प्रमाणावर शस्त्र खरेदी करतो. भारतीय लष्करात जवळपास ६० टक्के शस्त्रे ही रशियन बनावटीची आहेत. त्याशिवाय रशियाकडून एस—४०० ही क्षेपणास्त्रविरोधी एअर डिफेन्स सिस्टीम भारताला मिळणार आहे.[८] युद्ध पेटल्यास रशियावर निर्बंध लागू होण्याची शक्यता आहे. अशा स्थितीत रशियाकडून भारताला होणारा शस्त्र पुरवठा खंडित होऊ शकतो.

**निष्कर्ष :**

१. जागतिक बाजारपठेत कच्या तेलाच्या किमती वाढत आहे. त्यामुळे भारत सरकार दर हप्त्यामध्ये पेट्रोल, डिजेलच्या किमती वाढवत आहे.

२. पेट्रोल, डिजेलजच्या किमती वाढल्यामुळे इतर वस्तुंचे भाव गगणाला भिडत आहे.

३. गॅसच्या किमती वाढल्यामुळे हॉटेल व कॅटरींग व्यवसाय प्रभावित झालेला आहे.

४. जर युध्द असेच सुरू राहीले तर महागाई आपले रौद्र रूप धारण करणार.

Research Hub International Journal

५. पॅलेडियमची रशियाकडून निर्यात प्रभावित झाल्यामुळे यापासून बनणाऱ्या वस्तुंचे भाव मोठयाप्रमाणात वाढत आहे.

६. इकॉनामिक टाईम्सच्या वृत्तानुसार रूसो–युक्रेन युध्दामुळे भारताची GDP ७.१ टक्केवर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

७. रशिया–युक्रेन युद्ध सुरू राहिल्यास चलन विनिमय दरावर मोठा परिणाम होणार आहे.

८. रशिया–युक्रेन युद्ध सुरू राहिल्यास वाहन क्षेत्राला फटका बसण्याची भीती आहे.

९. युद्धामुळे आयात–निर्यात व्यापार प्रभावित होण्याची शक्यता नाकरता येत नाही.

१०. रशियाकडून भारताला होणारा शस्त्र पुरवठा खंडित होऊ शकतो.

**संदर्भ ग्रंथ सूची :**


- जाधव अभिजीत, एबीपी माझा वेब टीम, १८ मार्च २०२२, १२:२८ PM (IST)
- कित्ता
- गौरव मंदार, महाराष्ट टाईम्स, २६ फेब्रुवारी २०२२
- कित्ता
- कांबळे महादेव, टीव्ही ९ मराठी, २३ फेब्रुवारी २०२२, 6:48 PM
- भोसले श्रीकांत, एबीपी माझा वेब टीम, 24 Feb 2022, 03:19 PM (IST)
- देवरे ज्योती, abp majha web team | Updated at : 24 Mar 2022 11:58 AM
- कित्ता


Research Hub International Journal